महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

ई-मेल. vishi१-hted@mah.gov.in दूरध्वनी क्र.०२२ २२७९३१७४

क्रमांक:- संकीर्ण-२३०२/प्र.क्र.२८/भाग-१/विशि-१ दिनांक:- ०९ ऑगस्ट,२०२४

प्रति,

कुलसचिव,

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,मुंबई

विषय:- शिक्षकीय संवर्गाच्या बिंदूनामावलीस मान्यता देण्याबाबत.

संदर्भ:- आपले पत्र क्र.आस्था-०१/सामान्य-०३/२०२४-२५/१०५३, दि.२३.०७.२०२४

संदर्भाधीन पत्रान्वये श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,मुंबई येथील सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप ग्रंथपाल या संवर्गाच्या बिंदूनामावली तपासणीस आणि आरक्षणनिश्चितीस मान्यता देण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्यानुषंगाने आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) सामान्य प्रशासन विभाग (आरक्षण-३) यांनी सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप ग्रंथपाल या संवर्गाच्या दिनांक २६.०२.२०२४ अखेरच्या सरळसेवेच्या कोट्यातील बिंदूनामावलीच्या तपासणीस आणि आरक्षण निश्चितीस मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

२) उपरोक्त मान्यता ही केवळ सामाजिक आरक्षणाच्या अनुषंगाने देण्यात आली आहे. समांतर आरक्षणाबाबत विद्यापीठाने आपल्या स्तरावर उचित कार्यवाही करावी. तसेच मागणीपत्रात दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाच्या पदाची संख्या विहित आरक्षणानुसार आवश्यक संख्येइतकी आहे किंवा कसे ही बाब विद्यापीठाने आपल्या स्तरावरुन खातरजमा करणे आवश्यक आहे.

३) विद्यापीठाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार सामान्य प्रशासन विभागाकडून बिंदूनामावली तपासण्यात आली असून बिंदूनामावलीमध्ये तक्रारी किंवा न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यापीठाची राहील.

सोबत_:-

१) सामान्य प्रशासन विभाग (आरक्षण-३ ) यांच्या दि.०८.०८.२०२४ च्या टिपणीची छायांकित प्रत.

२) उपरोक्त संवर्गाची ०१ मुळ बिंदूनामावली पुस्तिका.

(सं.रा.उतेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवडनस्ती (विशि-१)

अनौ.सं.क्र.११७/२०२४ सामान्य प्रशासन विभाग/आरक्षण-३

पूर्व पृष्ठावरील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या टिप्पणीस अनुसरुन सादर.

२. उपरोक्त टिप्पणीन्वये, विभागाने श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई आणि संचलित संस्थामधील सहयोगी प्राध्यापक संवर्गाच्या दि.२६.०२.२०२४ अखेरच्या बिंदूनामावली तपासणीस व आरक्षण निश्चितीस मान्यता देण्याची विनंती केली आहे.

३. येथे असे नमूद करण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि.०७.०८.२०१९ व दि.१६.११.२०२२ नुसार १५ अकृषि व अभिमत विद्यापीठांसाठी मंजूर असलेल्या एकूण पदांपैकी ८० टक्के इतक्या मर्यादेत, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठासाठी एकूण ७८ शिक्षकीय व शिक्षक समकक्ष पदे भरण्यास मान्यता आहे. तसेच, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय, दि.२४.०७.२०२३ अन्वये एस.व्ही.टी.कॉलेज ऑफ होमसायन्स, मुंबई या महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक संवर्गातील ८ पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. अशी एकूण ८६ पदे भरण्यास मान्यता आहे. त्यापैकी प्राचार्य, प्राध्यापक/अधिष्ठाता, सहाय्यक प्राध्यापक/सहाय्यक संचालक/महाविद्यालय ग्रंथपाल/ सहायक ग्रंथपाल/ प्रकल्प अधिकारी, अधिव्याख्याता/ग्रंथपाल या संवर्गातील सरळसेवा कोट्यातील ६६ पदे भरण्याकरिता या विभागाने दि.३०.०७.२०२४ च्या टिप्पणीन्वये बिंदुनामावली तपासणी व आरक्षण निश्चिती करुन देण्यात आली होती. आता, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने यापूर्वी सादर केलेल्या दि.१४.०७.२०२४च्या टिप्पणीनुसार सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप ग्रंथपाल या संवर्गातील उर्वरित २० पदे भरण्यास मान्यता असल्याचे दिसून येते.

४. या विभागाने यापूर्वी सहयोगी प्राध्यापक संवर्गाची बिंदूनामावली तपासली असता, अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव बिंदू क्र.१ येथे दर्शविलेल्या डॉ.शितल मोरे यांची सदर बिंदूवरील नोंद रद्द करुन अराखीव प्रवर्गासाठी राखीव बिंदू क्र.६० वर घेण्यात आली होती. याबाबत उच्च व तंत्र विभागाकडून खुलासा मागविण्यात आला असता, विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा सादर केला आहे:-

सन १९९९ मध्ये आंतरजातीय विवाहांतर्गत प्राप्त केलेल्या जातप्रमाणपत्राच्या आधारे लाभ देणारी तरतूद शासनाने रद्द केलेली असतांनाही विद्यापीठाने डॉ. शितल मोरे यांना सन २००३ मध्ये सहयोगी प्राध्यापक या अनुसूचित जातीसाठी राखीव पदावर पदोन्नती/ नियुक्ती दिली आहे. त्यामुळे डॉ. शितल मोरे यांना सहयोगी प्राध्यापक पदावर दिलेली नियुक्ती अवैध ठरते असे या विभागाचे दि.६.०५.२०२४ च्या टिप्पणीन्वये अभिप्राय दिले होते. त्यानुषंगाने, विद्यापीठाने **"शासन निर्णय दिनांक ११/०४/२०२२ च्या शासन निर्णयानुसार तयार केलेल्या 'संवर्गनिहाय' बिंदुनामावलीमधील 'सहयोगी प्राध्यापक व समकक्ष पदे' या संवर्गाच्या बिंदुनामावलीमध्ये डॉ.शितल मोरे, सहयोगी प्राध्यापक यांची अनुसूचित जातीच्या बिंदूवरील नोंद कमी करुन अराखीवच्या रिक्त बिंदूवर त्यांचे समायोजन करण्यात यावे व त्याबाबतची आवश्यक कार्यवाही करण्यात यावी."** असा ठराव पारित करण्यात आला. त्यानुसार आता, विद्यापीठाने सहयोगी प्राध्यापक या संवर्गाच्या बिंदुनामावलीमध्ये डॉ.शितल मोरे यांची अराखीव प्रवर्गासाठी राखीव असलेल्या बिंदू क्र.८० येथे नोंद घेण्यात आली आहे.

उपरोक्तप्रमाणे विद्यापीठाने केलेली कार्यवाही योग्य असल्याचे गृहित धरुन तसेच विभागाने प्रस्तावामध्ये सादर केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन, सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप ग्रंथपाल या संवर्गाच्या दि.२६.०२.२०२४ अखेरच्या बिंदुनामावल्यांची सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि.२७.०२.२०२४ मधील तरतूदींनुसार पुढीलप्रमाणे तपासण्यात येत आहे.

अवर सचिव
सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

## ५. सरळसेवा बिंदुनामावली: सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप ग्रंथपाल

| | | |
|---|---|---|
| १ | सरळसेवेची बिंदुनामावली तपासावयाचा संवर्ग | सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/ उप ग्रंथपाल (वेतनश्रेणी- AL-१३A) |
| २ | एकूण मंजुर पदे | ६७ |
| ३ | सेवा प्रवेश नियमानुसार सेवा भरतीचे प्रमाण | सरळसेवा-१००% |
| ४ | सरळसेवेच्या कोटयातील पदे | ६७ |
| ५ | प्रस्तावासोबत प्रमाणित बिंदुनामावली सादर केली आहे काय | होय. |
| ६ | मंजुर सेवा प्रवेश नियम | दि.०८.०३.२०१९ पृ.६१-१२१/प.वि. |
| ७ | मंजुर पदांचा आकृति बंध | १) शा.नि., दि.२७.०५.२००९- ५७ पदे पृ.३७/प.वि.<br>२) शा. नि., दि.१३.०१.२०२३ - २ पदे पृ.४८/प.वि.<br>३) शा. नि., दि.०१.०४.२००४ - ८ पदे पृ.५७/प.वि. |

दि.२६.०२.२०२४ रोजीची स्थिती पुढीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | तपशील | अजा १३% | अज ७% | विजाअ ३% | भजब २.५% | भजक ३.५% | भजड २% | विमाप्र २% | इमाव १९% | अराखीव ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | ९ | ५ | २ | २ | २ | १ | १ | १३ | ३२ | ६७ |
| २ | भरलेली पदे | ५ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १९ | २५ |
| ३ | रिक्त पदे | ४ | ४ | २ | २ | २ | १ | १ | १३ | १३ | ४२ |

सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप ग्रंथपाल या संवर्गात ६७ मंजूर पदांचे आरक्षण अजा-९, अज-५, विजाअ-२, भजब-२, भजक-२, भजड-१, विमाप्र-१, इमाव-१३ व अराखीव-३२ असे राहील. सद्यस्थितीत सदर संवर्गात अजा-५, अज-१ व अराखीव-१९ अशी एकूण २५ पदे कार्यरत आहेत. या संवर्गात अजा-४, अज-४, विजाअ-२, भजब-२, भजक-२, भजड-१, विमाप्र-१, इमाव-१३ व अराखीव-१३ याप्रमाणे ४२ पदे रिक्त आहेत.

उपरोक्तप्रमाणे सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप ग्रंथपाल या संवर्गाची सरळसेवा कोट्याची बिंदूनामावली प्रमाणित करण्यास हरकत नसावी.

## ६. आरक्षणाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | तपशील | अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आरक्षणाचे प्रमाण /टक्केवारी | १३ | ७ | ३ | २.५ | ३.५ | २ | २ | १९ | २८ | १०० |
| १ | मंजूर पदे | ९ | ५ | २ | २ | २ | १ | १ | १३ | ३२ | ६७ |
| २ | भरलेली पदे | ५ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १९ | २५ |
| ३ | रिक्त पदे | ४ | ४ | २ | २ | २ | १ | १ | १३ | १३ | ४२ |
| ४ | दि.३०/०८/२०२४ पर्यंतची संभाव्य रिक्त पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | एकूण रिक्त पदे | ४ | ४ | २ | २ | २ | १ | १ | १३ | १३ | ४२ |

G:\आरक्षण-३\२०२४\अनौपचारिक संदर्भ\उच्च व तंत्र शिक्षण विभाग\अनौ.सं.क्र.११७ सहयोगी प्राध्यापक, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.docx

अवर सचिव
सामान्य प्रशासन विभा
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४००

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | विभागाने भरतीसाठी मागणी केलेली पदे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २० |
| ७ | मागणीपत्रासाठीची पदे | २ | २ | १ | १ | १ | ० | १ | ६ | ६ | २० |

सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप ग्रंथपाल या संवर्गातील २० रिक्त पदांचे आरक्षण अजा-२, अज-२, विजाअ-१, भजब-१, भजक-१, विमाप्र-१, इमाव-६ व अराखीव-६ असे राहील.

७. येथे असे नमुद करण्यात येते की, सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप ग्रंथपाल या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील मंजूर पदसंख्येनुसार आदुघ आणि साशैमाप्र करिता उपलब्ध असलेल्या १० टक्के आरक्षणानुसार येणारी पदे ही टप्प्याटप्प्याने भरावयाची असल्याने सदर पदे १० टक्के आरक्षणानुसार पूर्ण पदे भरली जाईपर्यंत खुल्या प्रवर्गाकरिता मंजूर पदांची गणना ४८ टक्के नुसार दर्शविण्यात आली आहे.

सदर संवर्गात यापूर्वी करुन दिलेल्या आरक्षण निश्चितीनुसार पदभरती झालेली नसल्याने हे भरती वर्ष आदुघचे प्रथम भरती वर्ष म्हणून गणण्यात येत आहे.

सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप ग्रंथपाल या संवर्गात मागणीपत्र पाठवितांना साशैमाप्र करिता आरक्षित पदांची गणना पुढीलप्रमाणे राहील:- (प्रथम भरती वर्ष)

| एकूण भरावयाची पदे | साशैमाप्र करिता एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्केनुसार भरावयाची पदे |
|---|---|
| २० | २.० पुर्णांकात २ पदे |

सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप ग्रंथपाल या संवर्गात मागणीपत्र पाठवितांना आदुघ करिता आरक्षित पदांची गणना पुढीलप्रमाणे राहील:- (प्रथम भरती वर्ष)

| एकूण भरावयाची पदे | आदुघ करिता एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्केनुसार भरावयाची पदे |
|---|---|
| २० | २.० पुर्णांकात २ पदे |

८. सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप ग्रंथपाल या संवर्गातील भरावयाच्या पदांची खालीलप्रमाणे आरक्षण निश्चिती करुन देण्यात येत आहे:-

| तपशील | अजा १३% | अज ७% | विजाअ ३% | भजब २.५% | भजक ३.५% | भजड २% | विमाप्र २% | इमाव १९% | साशैमाप्र १०% | आदुघ १०% | अराखीव २८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागणीपत्र पाठविण्यासाठी उपलब्ध पदे | २ | २ | १ | १ | १ | ० | १ | ६ | २ | २ | २ | २० |

सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप ग्रंथपाल या संवर्गातील एकूण २० रिक्त पदांचे आरक्षण अजा-२, अज-२, विजाअ-१, भजब-१, भजक-१, विमाप्र-१, इमाव-६, साशैमाप्र-२, आदुघ-२ व अराखीव-२ असे राहील.

९. उपरोक्त सहमती ही केवळ सामाजिक आरक्षणाच्या अनुषंगाने देण्यात आलेली आहे. समांतर आरक्षणाबाबत विभागाने आपल्या स्तरावर उचित कार्यवाही करावी. तसेच, मागणीपत्रात दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाच्या पदाची संख्या विहित आरक्षणानुसार आवश्यक संख्येइतकी आहे किंवा कसे ही बाब विभागाने आपल्या स्तरावरुन खातरजमा करणे आवश्यक आहे.

G:\आरक्षण-३\२०२४\अनौपचारिक संदर्भ\उच्च व तंत्र शिक्षण विभाग\अनौ.सं.क्र.११७ सहयोगी प्राध्यापक, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.docx

अवर सचिव
सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

१०. विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार बिंदुनामावली तपासण्यात आली असून बिंदूनामावल्यांमध्ये तक्रारी किंवा न्यायालयीन प्रकरण उध्दभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विभागाची राहील.

११. उपरोक्तप्रमाणे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठातील सहयोगी प्राध्यापक/सहायक संचालक/विभाग प्रमुख/उप ग्रंथपाल या संवर्गांच्या दि.२६.०२.२०२४ अखेरच्या सरळसेवा कोट्यातील बिंदूनामावल्यांच्या तपासणीस व आरक्षण निश्चितीस मान्यता देण्यास हरकत नसावी.

वरील अभिप्रायासह नस्ती उच्च व तंत्र शिक्षण विभागास परत पाठविण्यात यावी.

क.अ.(डॉ. शिंदे)

अ.स.(श्री. चेमटे)

उ.स.(श्री. खडसे)

सचिव (साविस)(श्री.पाटील)

प्र.स.(उ. व तं.शि.वि.)

अवर सचिव
सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

G:\आरक्षण-३\२०२४\अनौपचारिक संदर्भ\उच्च व तंत्र शिक्षण विभाग\अनौ.सं.क्र.११७ सहयोगी प्राध्यापक, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.docx